महाराष्ट्र विधानपरिषद
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
मंगळवार, दिनांक २ एप्रिल, २०१३.
(सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

(मंगळवार, दिनांक २६ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव) -

सर्वश्री. हेमंत टकले, सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. एम.एम.शेख, अब्दुल्ला खान दुर्राणी, विक्रम काळे, कपिल पाटील, विनायकराव मेटे, राणा जगजितसिंह पाटील **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"सन १९७६ मध्ये पूर्ण झालेल्या औरंगाबाद जायकवाडी धरणाची क्षमता १०२ टीएमसी असणे, परंतु धरणाच्या वरील बाजूस ११५ टीएमसी पाणी अडविण्याची परवानगी आयोगाने दिलेली असतांनाही जागोजागी बंधारे व धरणे बांधून नियमबाह्य पध्दतीने १८५ टीएमसी पाणी अडविल्याने जायकवाडी संकल्पीत साठ्याच्या केवळ २ टक्के पाणी आले असणे, औरंगाबाद, बीड, जालना, परभणी या जिल्ह्यातील पेयजल सिंचन व उद्योग धंदे, शिवाय परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र जायकवाडीच्या पाण्यावरच अवलंबून असून मराठवाड्यातील जनता पाण्यासाठी हवालदिल झालेली असणे, जायकवाडी प्रकल्प धरण या खोऱ्यातील पाणी साठ्याची टक्केवारी ३५ टक्के असून संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार जायकवाडीच्या वरील भागातील धरणांतून २७ अब्ज घनफूट पाणी सोडणे बंधनकारक असणे, कृष्णेचे २१ टीएमसी हक्काचे पाणी देण्यातही मराठवाड्यावर अन्याय झालेला असणे, तसेच मराठवाड्याच्या वाट्याला आलेल्या २५ टीएमसी पाण्यासाठी रु.४,८४५ कोटींची प्रशासकीय मान्यता दिलेली असून मागील ५ वर्षात यापैंकी रु.५३५ कोटींची तरतूद झालेली असणे, उर्वरित कामासाठी निधीची तरतूद त्वरीत करणे आवश्यक असणे, प्रत्यक्षात ७ टीएमसीचीच कामे सूरु असून, त्यात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा टप्पा नं.१ व कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचा काही भाग असणे, हा प्रकल्प पूर्ण करणेसाठी ३३०० कोटी रुपयाची आवश्यकता असणे, गोदावरी खोऱ्यात नविन १८ टीएमसी पाणी साठवण्यास परवानगी असणे, परंतु नवीन लघू प्रकल्पाला मान्यता मिळत नसल्याने अडचणी येत असणे, याबाबतीत शासनाने त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असणे, याकरीता शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

(दुपारी १२.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : शोक प्रस्ताव -

"डॉ. (श्रीमती) इंदूताई धनंजयराव नाकाडे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव."

तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - (असल्यास).

चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).

पाच : लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -

(शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला लक्षवेधी सूचना - अनुक्रमांक १)-

(१) **श्री. प्रकाश बिनसाळे,** श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, नरेंद्र पाटील, निरंजन डावखरे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" मुंबईमध्ये तब्बल ५४०० मोबाईल टॉवर असून त्यापैकी ३३७० टॉवरना पालिकेची परवानगी असणे, या टॉवरमधून होणाऱ्या किरणोत्सर्गामुळे मानवी आरोग्यास तसेच पशुपक्षांवर विपरित परिणाम होणे, यासाठी पालिकेने काही धोरणे आखलेली असणे, तथापि सदर धोरणाची अंमलबजावणी मोबाईल टॉवर कंपन्यांकडून न करता मोठ्या प्रमाणात मानवी आरोग्यावर तसेच पशुपक्ष्यांवर विपरित परिणाम होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने केलेली व करण्यांत येत असलेली कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. सुभाष चव्हाण,** संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. जयवंतराव जाधव, विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. राम पंडागळे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"माहे जानेवारी, २०१३ मध्ये श्रीरामपूर (जि.अहमदनगर) या तालुक्यातील सोनईजवळ मेहत्तर समाजातील शौचालय साफ करणाऱ्या तीन तरुणांची अत्यंत निर्घृणपणे झालेली हत्त्या, एका श्रीमंत बागायतदाराने या तरुणांना विठ्ठलवाडी शिवारात शौचालय साफ करण्याचे कारण सांगून बोलविण्यात येणे, चारा कापण्याच्या अडकित्याचा वापर करण्यात येऊन अतिशय निर्घृणपणे एका तरुणाचे हातापायाचे, डोक्याचे व शरीराचे बारीक बारीक

तुकडे करण्यात येऊन ते बोअरमध्ये टाकण्यात येणे, याबाबत संबंधित पोलीस स्टेशनने गुन्हा नोंदविण्यास दिरंगाई करुन तसेच या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यास टाळाटाळ व दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री जयप्रकाश छाजेड वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शिक्षण व समाजकल्याण विभाग शासननिर्णय क्र.सी.बी.सी. १०७६/४३७९०/५/१९७७ अन्वये राज्यातील खाटीक जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्यात येणे, सन १९८७ पासून खाटीक समाज राज्यात विखुरलेला असून अनुसूचित जातीच्या लाभापासून व अमंलबजावणीपासून वंचित असणे, खाटीक समाजाला जात पडताळणी दाखले वेळेवर न मिळणे, त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी खाटिक समाज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे, ग्रामपंचायत, नगरपरिषद, महापालिका व कृषी उत्पादन बाजार समितीमध्ये बकऱ्यांच्या मंडीसाठी राखीव जागा मिळणे, केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत कत्तलखान्यासाठी शंभर टक्के अनुदान मिळावे, गटई कामगारांच्या स्टॉलप्रमाणे खाटीक समाजाला स्टॉल मिळावेत, जिल्हा, तालुका पातळीवर शेळ्या, मेंढ्या संस्था काढण्यासाठी शासनाकडून निधी मिळावा इत्यादी विविध मागण्यासंदर्भात दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी खाटीक समाजातर्फे मोर्चाचे करण्यात आलेले आयोजन, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** धनंजय मुंडे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बीड जिल्ह्यात नाफेडच्या उडीद खरेदीसाठी महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटींग फेडरेशनच्या वतीने बीड व गेवराई या दोन ठिकाणी सुरु केलेल्या उडीद खरेदी केंद्रांवर रुपये ४,३००/- प्रति क्विंटल आधारभुत दराने सुमारे १९,५०० मेट्रीक टन उडीदाची खरेदी होणे, बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे उडीदाच्या उत्पादनात घट होणे, प्रशासकीय आकडेवारीनुसार जिल्ह्याभरात ४,१४१ मेट्रीक टन उडीदाच्या उत्पादनाची नोंद होणे, मात्र, मार्केटींग फेडरेशनच्या जिल्हा मार्केटींग अधिकाऱ्याने व्यापारी, दलाल यांच्याशी संगनमत करुन सुमारे १७,००० मेट्रीक टन निकृष्ट दर्जाचा उडीद बाहेरील जिल्ह्यातुन आणुन या केंद्रावर विक्री करणे, खरेदी केंद्रावरील खरेदी केलेल्या उडीदा बरोबर शेकडो क्विंटल माती, दगड एकत्रित करुन त्याचेही पैसे उचलणे, शेतकऱ्यांच्या नावे बोगस आर्थिक व्यवहार करणे, अनेक

शेतकऱ्यांनी या केंद्रावर उडीद विक्री केली नसल्याचे लेखी कळविणे, सुमारे १० कोटी रुपयांचा आर्थिक अपहार व भ्रष्टाचार अधिकाऱ्यांनी करणे, लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी व संबंधितांकडे केलेल्या तक्रारीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शासकीय निधीचा होत असलेला गैरवापर, शासनाने या गंभीर विषयाबाबत करावयाची सत्वर कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. रामदास कदम,** ॲड. अनिल परब **वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"तब्बल १३३ कोटीहुन अधिक किंमतीची पुणे येथील राज्य सहकारी संघाच्या मालकीची मालमत्ता बीओटी साठी विकासकास अवघ्या ३५ कोटी ११ लाख रुपयांत देण्याचा नियमबाह्य करार संघाच्या संचालकांनी केल्याने त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश माहे ऑगस्ट, २०१२ च्या सुमारास सहकार आयुक्तांनी देणे, राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळातील आर्थिक अनियमिततेमुळे राज्य सरकारने संचालक मंडळ सन २०११ च्या जानेवारी महिन्यात बरखास्त करणे, त्याच काळात संचालक मंडळाच्या बीओटी समितीच्या झालेल्या एकाच बैठकीत सदरहू करार रद्द करण्यात आल्याचे सन २०१२ च्या पावसाळी अधिवेशनात सांगण्यात येऊनही अद्यापही हा करार रद्द करण्यात न येणे, तसेच संघातील या गैरव्यवहाराबाबत कोर्टात दाखल करण्यात आलेल्या दाव्याच्या निकालांमध्ये संघाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांविरुध्द बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही पोलिसांनी याप्रकरणी दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया व भुमिका."

(६) **श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"शेगाव (जि.बुलढाणा) येथील मौजे जानोरी या गावातील नळयोजना जलस्वराज्य प्रकल्पातून ग्रामीण पाणीपुरवठा समितीने बांधून पूर्ण केल्यानंतर या समितीने २२ महिने सक्षमपणे गावास पाणी पुरवठा करणे, दिनांक ७ जून, २०१० रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार समितीने ही योजना जानोरी ग्रामपंचायतीस हस्तांतरीत केल्यानंतर या योजनेतून होणारा पाणीपुरवठा बंद होणे, परिणामी गावातील नागरिकांना नजीकच्या टाकळीधारव, तिवान या गावांवरुन पाणी आणावे लागणे, या योजनेतून पाणी पुरवठा पुर्ववत सुरु होण्यासाठी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी बुलढाणा

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी ही नळपाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत सूचना करुनही आजतागायत ही योजना सुरु न होणे, परिणामी नागरिकांना भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत असणे, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

सहा : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

- मध्यंतर -

सात : शासकीय विधेयके :-

(अ) पुर:स्थापनार्थ -

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१३

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे -

(१) सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

(२) सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

आठ : म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव -

डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री मोहन जोशी, चरणसिंग सप्रा, हेमंत टकले, रमेश शेंडगे, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती अलका देसाई **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

राज्यात अपंग व्यक्तींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ३ टक्के म्हणजेच सुमारे ४० लक्ष असून अपंगांच्या विविध समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, अपंग व्यक्तींसाठी महानगर व नगरपालिका क्षेत्रात स्टॉल, गाळे राखून ठेवावेत असा नियम असताना ही त्याची अंमलबजावणी न होणे, अपंग विकास वित्तीय महामंडळासाठी भरीव आर्थिक तरतूद नसणे, त्यामुळे अनेक योजना केवळ कागदावर रहाणे, अपंगांना विशेष अधिकार देणाऱ्या कायद्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक असणे, अपंगत्व येऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपचाराविषयी जनसामान्यांमध्ये विशेष जाणिव नसणे, जन्मतःच असलेल्या श्रवण दोषांमुळे बधीरत्व निर्माण होत असणे, कॉक्लिअर इंम्प्लांट (cochlear implant) या शस्त्रक्रियेमुळे हा दोष दूर होऊन त्या असंचय बालकांचे कर्णबधीरत्व दूर होऊ शकते, यासाठी शासनाने या शस्त्रक्रियेचा संपूर्णपणे भार उचलण्याची आवश्यकता, अपंगांसाठी असलेल्या शाळांमधील शिक्षकांच्या, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या, कंत्राटी पध्दतीने नेमणुका, विनाअनुदानीत शाळांचे प्रश्न, कार्यशाळेच्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन देणे, यासारखे अनेक प्रश्न प्रलंबित रहाणे व अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा संख्यात्मक जरी पुरेशा वाटत असल्या तरी जगाच्या तुलनेत त्या परिपूर्ण नसणे, शैक्षणिक दर्जा विषयी दुर्लक्ष असणे, त्यात अधिक संशोधन व स्वंतत्र व्यवस्था निर्माण करण्याची गरज असणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रोत्साहनात्मक योजनांचा अभाव असणे, याविषयी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

नऊ : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -

(१) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.

" बीड येथील जिल्हा रुग्णालयात यंत्रसामुग्री बिघडल्याने रुग्णालयातील अनेक विभाग बंद असल्याबाबत " या विषयावरील श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४६८८ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

" राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकासाठी केंद्र शासनाने ५५१ कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर करण्याची केलेली मागणी " या विषयावरील श्री.दिवाकर रावते व इतर वि.प.स.

यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४४१३ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १ एप्रिल, २०१३.

डॉ.अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.